संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# आता मतदानाच्या सन्मानाची प्रतिक्षा

**भारताच्या** इतिहासात पहिल्यांदाच इतक्या प्रचंड लांबलेल्या लोकसभा निवडणुकीची सांगता झाली आहे. सातही टप्प्यांचे मतदान आटोपल्यानंतर आता सर्वांनाच निकालाची प्रतिक्षा असेल. प्रत्यक्षात काय निकाल लागतील हे मतमोजणीनंतरच समोर येईल. तरीदेखील जे पक्ष निवडणुकीच्या रिंगणात असतात. ते आपापल्या पध्दतीने अंदाज बांधतात. काहीवेळेला त्यांचे अंदाज अतिशयोक्तीपूर्ण असतात. परंतु आपण नेमकेपणाने कुठे उभे आहोत किंवा मतदार आपल्याला केव्हाही कशाही प्रकारचा तडाखा देऊ शकतील. याचीदेखील मानसिक तयारी त्यांनी केलेली असते. मतदानोत्तर चाचण्यांमधून वेगवेगळे निष्कर्ष समोर येतीलही परंतु या चाचण्या शेवटी एक अंदाजच असतात. ते शंभर टक्के खरे नसतात. परंतु भारतासारख्या सर्वात मोठ्या लोकशाहीवादी देशाला एका स्थिर सरकारची आवश्यकता आहे. मात्र जर ते स्थिर सरकार मिळू शकत नसेल तर एकूणच देशाच्या हिताचा विचार करून आघाडी सरकार स्थापन होऊ शकते. सरकार कोणत्या पक्षाचे येते. याहीपेक्षा ते सामान्य जनतेच्या अपेक्षा आणि आकांक्षा पूर्ण करणारे असले पाहिजे. आज आपल्या लोकशाहीवादी देशात लोकांच्या मताचा फक्त विचार केला जातो. त्यांच्या अपेक्षांना किंमत दिली जात नाही. एखादा पक्ष निवडून यावा किंवा एखादा उमेदवार निवडून यावा ही त्या त्या मतदाराची अपेक्षा असेलही. परंतु सामुहिकपणे जनतेच्या अशा आकांक्षांची पूर्तता करण्याचा प्रयत्न होताना दिसत नाही. उलट सर्व राजकीय पक्ष जनतेच्या अपेक्षांपेक्षा स्वतः चा जाहीरनामा प्रकाशित करून पक्षाचा अजेंडा राबवण्याचा प्रयत्न करतात. म्हणजे मतदान लोकांनी करायचे. आणि राजकीय पक्षांनी आपापले अजेंडे पूर्ण करायचे अशी सध्याची परिस्थिती आहे. म्हणूनच या लोकसभा निवडणुकीचा विचार करीत असताना त्यातला प्रचार राजकीय नेत्यांची भाषणे निवडणूक कार्यपध्दती किंवा आचारसंहितेसारखा मोठा व्याप सांभाळण्याचा जो प्रकार घडतो त्यामधून एकूणच भारतीय निवडणूक पध्दतीच्या विकासाला बराच मोठा वाव आहे असे म्हणण्याची वेळ येते.

### लोकशाहीच्या सिध्दांतासाठी

निवडणूक संपली आहे. याचा अर्थ फार मोठी लोकशाही प्रक्रिया पार पडली असा समज करून घेण्याची गरज नाही. २०२२ च्या निवडणुकीत भारत स्वातंत्र्याची ७५ वर्षे पूर्ण करील. या काळात झालेल्या अठरा लोकसभा निवडणुकांचा लेखाजोखा घेतला तर निश्चितच राजकीय पक्ष , राजकीय नेते या सर्वांच्याच अमर्याद स्वातंत्र्याला किंवा मनमानीपणाला मर्यादा घालण्याची गरज वाटू लागते. कारण सरकार निवडून देणे एवढेच मतदारांचे काम नाही. ते सरकार जबाबदारीने चालले पाहिजे. म्हणजेच सरकार चालवणारे प्रतिनिधी आपल्या कर्तव्याला बांधील असले पाहिजेत. दुर्दैवाने आज तशी परिस्थिती नाही निवडून येणे या गोष्टीलाच सर्वाधिक महत्व दिले जाते. आणि निवडून आल्यानंतर आपली कोणतीच जबाबदारी शिल्लक नाही. अशा पध्दतीचे वर्तन जिंकून आलेल्या लोकांकडून घडते यासाठी निवडणूक प्रक्रिया ही केवळ मतदानापुरती मर्यादित न राहाता कर्तव्यांचे भान जपणारी किंवा आपल्या जबाबदाऱ्यांचे वेळोवेळी स्मरण करून देणारी व्यवस्था राहिली पाहिजे. तशा प्रकारच्या सुधारणा त्यात केल्या पाहिजेत. एकदा निवडून गेलेला लोकप्रतिनिधी पुढची पाच वर्षे कसा वागणार आहे. किंवा त्याचे नेमके दायित्व काय असेल हे दायित्व जर त्याने पार पाडले नाही. तर त्याला त्याची तशा प्रकारे जाणीव करून देण्याचीसुध्दा व्यवस्था असली पाहिजे. म्हणजेच मतदानानंतर मतदारांनी आपण केलेल्या मतदानाचे जागरण केले पाहिजे. म्हणजेच त्या त्या लोकप्रतिनिधींना त्यांच्या कर्तव्यांचे स्मरण करून दिले पाहिजे. हे करण्यासाठी निश्चितच निवडणूक सुधारणांची गरज भासेल. या सुधारणा करण्याकरीता मतदारांना किंवा समाजातील विचारवंतांना पुढाकार घ्यावा लागेल. कोणालाही मतदारांच्या मतदानाचा अपमान करण्याचा अधिकार नसेल म्हणजेच मतदानाचा सन्मान करण्याचे भान त्यांच्यामध्ये निर्माण करावे लागेल. आज इतका प्रचंड खटाटोप करून लाखो निवडणूक प्रक्रिया पार पाडली जाते. ज्यासाठी लाखो कर्मचारी, लाखो पोलीस, लाखो राजकीय कार्यकर्ते आणि कोट्यवधी मतदार आपला वेळ, पैसा ,शक्ती बुध्दी खर्च करीत असतात. एवढेच नव्हे तर अब्जावधीच्या पैशाची उधळण या प्रक्रियेवर होत राहाते.

### राजकीय नव्हे राष्ट्रीय महत्त्व

ज्यासाठी हा सगळा खटाटोप केला जातो तो केवळ पाचशे साडेपाचशे उमेदवारांना निवडून देण्यासाठी नाही. तर ज्याकोट्यवधी मतदारांनी काही अपेक्षा मनामध्ये ठेवून देशहितासाठी केलेल्या मतदानाचा सन्मान राखण्यासाठी असतो. हे लक्षात घेतले पाहिजे. लोकशाहीत निवडणूक प्रक्रियेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. परंतु आज ही निवडणूक प्रक्रिया म्हणजे केवळ लोकप्रतिनिधी निवडून देण्यासाठी राबवली जाते. आणि हेच लोकप्रतिनिधी देशाचे भाग्यविधाते असतात. असे जे काही विचित्र आणि एकतर्फी चित्र रंगवले जाते ते नाहीसे केले जाते. निवडणूक ही मतदानाच्या सन्मानाची किंवा लोकशाहीच्या सिध्दांतांचे जागरण करणारी प्रक्रिया आहे हे स्पष्टपणाने सांगितले पाहिजे. किंबहुना सर्वांच्याच मनावर ते बिंबवण्याची गरज आहे. पुढच्या पाच सहा दिवसामध्ये निकाल लागतील. आणि निवडणुकीचा भला मोठा व्याप पूर्ण होईल. जनतेनेसुध्दा या निकालांचे विश्लेषण करताना कोणत्या पक्षाला किती मते मिळाली. किंवा कोण कसा विजयी झाला यापेक्षाही त्या विजयामधून आपण केलेल्या मतदानाचा सिद्धांतिकदृष्ट्या किंवा लोकशाहीदृष्ट्या किती सन्मान झाला याची चाचपणी केली पाहिजे. हे मतदान केवळ उमेदवारांना निवडून देण्यासाठी नसते तर लोकशाहीच्या सिध्दांतांचे प्रकटीकरण असते. एकेक मत अमूल्य असल्यामुळे लोकशाहीच्या सिध्दांताचेच मूल्य त्यामधून व्यक्त होत असते. ही बाब गांभीर्याने लक्षात घेतली गेली पाहिजे. लक्षात आणून दिली पाहिजे. केवळ राजकीय अंगाने किंवा राजकीय दृष्टीकोनातून विचार न करता राष्ट्रीय दृष्टीकोनातून त्याचे महत्त्व बिंबवण्याची गरज आहे.